पुढारी

# वाघ अभियांत्रिकीत चार नवीन उद्योगभिमुख शिक्षणक्रम

## • रोबोटिक ऑटोमेशनसह आणि क्वांटम अभियांत्रिकीचा समावेश

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

के. के. वाघ संस्थेच्या स्वायत्त दर्जाप्राप्त अभियांत्रिकी व संशोधन संस्थेने या वर्षापासून चार नवीन उद्योगाभिमुख शिक्षणक्रमांची घोषणा केली. त्यामध्ये रोबोटिक ऑटोमेशन, हिटिंग, व्हेंटिलेशन ॲण्ड एअर कंडिशनिंग (एचव्हीएसी), क्वांटम अभियांत्रिकी, इंडस्ट्रियल ऑटोमेशन यांचा समावेश आहे. या अभ्यासक्रमाची स्वतंत्र डिझाईन संस्थेतील तज्ज्ञ अभ्यासकांनी केली आहे. डॉ. उदय वाड, जयंत कुलकर्णी, सुरेश दिडमिशे आणि अनिल आहेर या चार तज्ज्ञ अभियंत्यांनी शिक्षणक्रमाचे औद्योगिक क्षेत्रासाठी महत्त्व विशद केले.

उद्योजक तथा कोर्सेसच्या आखणीत सहभागी नीलेश साळगावकर यांनी औद्योगिक क्षेत्रात लागणारे ज्ञान, कौशल्ये व शैक्षणिक अभ्यासक्रम यातील मोठे अंतर भरून करण्यासाठी हे शिक्षणक्रम उपयुक्त ठरतील, असे सांगितले 'रोबोटिक्स ॲण्ड ऑटोमेशन' विभागप्रमुख प्रा. डॉ. पद्माकर पवार म्हणाले की, उत्पादन क्षेत्राच्या सर्व विभागांमध्ये 'लीन मॅनेजमेंट'चा वापर वाढला आहे. हे ज्ञानप्राप्त विद्यार्थ्यांची औद्योगिक क्षेत्रात मोठी मागणी असून, ती भविष्यात वाढत जाणार आहे. 'एचव्हीएसी' शिक्षणक्रमाने विद्यार्थ्यांना चांगल्या नोकरीसह नवीन उद्योग सुरू करण्याचीही संधी प्रदान करते, असे प्रा. डॉ. प्रशांत कुशारे यांनी सांगितले. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. रवींद्र मुंजे म्हणाले, 'इंडस्ट्रियल ऑटोमेशन' पदवी प्राप्त विद्यार्थी इलेक्ट्रॉनिक सर्किट्स स्वहस्ते निर्माण करू शिकतील.

प्रा. डॉ. स्नेहल कमलापूर म्हणाल्या की, क्वांटम कम्प्युटिंग पारंपरिक संगणकापेक्षा लाख पटींनी वेगवान असून, पुढील पिढीच्या तांत्रिक क्रांतीचा तो मजबूत पाया ठरणार आहे. हे तंत्रज्ञान अत्यंत गुंतागुंतीच्या समस्या काही सेकंदांत सोडवण्याची क्षमता प्रदान करेल. एआय, सायबर सुरक्षा यांसारख्या क्षेत्रांना नवे आयाम प्रदान करेल. जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ यांनी आभार मानले.




**नाशिक : नवीन शिक्षणक्रमांबद्दल माहिती देताना अजिंक्य वाघ. मंचावर प्रा. डॉ. केशव नांदूरकर, डॉ. उदय वाड, जयंत कुलकर्णी, सुरेश दिडमिशे.**

### मोजक्या कॉलेजमध्ये वाघ अभियांत्रिकी

औद्योगिक क्षेत्रात मोठा अनुभव असलेल्या तज्ज्ञ इंजिनिअर्सने हे कोर्स आखलेले असून, तज्ज्ञ स्वतः शिकवणार आहेत, अशी माहिती यावेळी महाविद्यालयाचे संचालक प्रा. डॉ. केशव नांदूरकर यांनी दिली.

Nashik Edition
Jun 21, 2025 Page No. 09
Powered by: erelego.com